# दहशतवाद, भ्रष्टाचारविरोधी लढ्याची धग काँग्रेसला का बसत नाही ?

**उद्धव ठाकरे यांचा सवाल**

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) - मुंबईवरील दहशतवादी हल्ला आणि ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाची धग काँग्रेस आणि राष्ट्रवादीला बसत कशी नाही? असा सवाल करतानाच याचा प्रसारमाध्यमांनी शोध घेतला पाहिजे, असे प्रतिपादन शिवसेना कार्यप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज केले.

पत्रकार प्रवीण बर्दापूरकर लिखित 'नोंदी डायरीनंतरच्या' आणि 'दिवस असे की' या ग्रंथालीच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन प्रभादेवीच्या रवींद्र नाट्यमंदिरात झाले. 'दिवस असे की' या पुस्तकाचे उद्धव ठाकरे यांच्या, तर 'नोंदी डायरीनंतरच्या' या पुस्तकाचे ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. याप्रसंगी या दोन्ही पुस्तकांच्या ई-आवृत्तीचेही प्रकाशन झाले.




पत्रकार प्रवीण बर्दापूरकर लिखित 'दिवस असे की' आणि 'नोंदी डायरीनंतरच्या' या दोन पुस्तकांचे प्रकाशन करताना शिवसेना कार्यप्रमुख उद्धव ठाकरे. सोबत ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर व अन्य.